**लेखानुदान - २०११-२०१२** मुख्यलेखाशीर्ष "मागणी क्रमांक सी-१०-४४०६- वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च(योजनेतर/योजनांतर्गत/दत्तमत) याखालील अनुदानाची नियंत्रणाधिकारी निहाय वाटणी.

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक पी -४४०६ /२०११-२०१२/प्रक्र.९५/ब-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १ एप्रिल, २०११

वाचा - **महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र. लेखानु २०.११/ सी.आर.६५/अर्थसंकल्प-३ दि.३१.३.२०११**

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्राच्या एकत्रित निधीमधून २०११-२०१२ या वित्तीय वर्षात पहिल्या दोन महिन्यांचा खर्च भागविण्यासाठी काही रकमा काढून घेण्यास शासनाला प्राधिकृत करणारे "महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, २०११" मंजूर झाले आहे. सदर विधेयकाचे आता अधिनियमात रुपांतर झाले असून तो महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण भाग-४ मध्ये दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी प्रसिध्द झाला आहे.

२. वरील परिच्छेदामध्ये उल्लेखिलेल्या अधिनियमाला अनुसरुन "मागणी क्रमांक सी-१०- ४४०६- वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च(योजनेतर/योजनांतर्गत) (दत्तमत)" या मुख्यलेखाशीर्षाखालील १ एप्रिल २०११ ते ३१ मे २०११ या कालावधीतील खर्च भागविण्यासाठी सोबत जोडलेल्या तक्त्याच्या रकाना क्रमांक ४ मध्ये नमूद केलेली रक्कम संबंधित नियंत्रक अधिका-यांकडे या निर्णयाद्वारे सुपुर्द करण्यात येत आहे. तसेच सदर तरतुदी अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

३. नियंत्रक अधिका-यांनी या निर्णयाद्वारे त्यांच्याकडे सुपुर्द केलेले अनुदान त्यांच्या नियंत्रणाखाली प्राक्कलन अधिकारी असल्यास त्यांच्याकडे सुपुर्द करावे व तत्संबंधीच्या आदेशाच्या प्रती लेखापरीक्षा कार्यालय आणि ब-१ कार्यासनाला पाठवाव्यात. तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे तरतुदी वितरीत करण्याची कार्यवाही करावी. प्राक्कलन अधिका-यांकडे अनुदान सुपूर्द करताना त्यांना १ एप्रिल २०११ ते ३१ मे २०११ या मुदतीत त्यांच्याकडे सुपूर्द केलेल्या अनुदानापेक्षा कोणत्याही परिस्थितीत खर्च जास्त होणार नाही, याची दक्षता घेण्यास सांगावे.

४. लेखानुदानात "खर्चाच्या नवीन बाबी" साठी केलेल्या तरतुदी समाविष्ट नसतात. त्यामुळे या निर्णयान्वये नियंत्रक अधिका-यांकडे वर नमूद केल्याप्रमाणे पहिल्या दोन महिन्यांचा खर्च भागविण्यासाठी सुपूर्द केलेल्या अनुदानातून नियंत्रण अधिका-यांनी नवीन खर्चाच्या बाबीवर खर्च करु नये.

५. सोबतच्या तक्त्याच्या रकाना क्रमांक ३ मध्ये नमूद केलेली रक्कम ही २०११-२०१२ या वित्तीय वर्षा संपूर्ण अनुदान असून त्यामध्ये रकाना क्रमांक ४ मध्ये नमूद केलेली रक्कम सुध्दा समाविष्ट आहे.

६. या निर्णयासोबत जोडलेल्या तक्त्याच्या रकाना क्रमांक १ मध्ये दर्शविलेल्या गौण/उपशीर्षाखाली त्या त्या उप/तपशील शीर्षाला "संगणकयंत्र" संकेतांक दिले आहेत. ते नियंत्रक अधिका-यांनी "आंहरण व संवितरण" अधिका-यांना अनुदान वाटतांना कळवावे आणि त्यांना दोन अंकी "प्रमाणभूत" बाब संकेतांक क्रमांकासह कोषागार/उपकोषागार यांच्याकडे पाठविण्यात येणा-या देयकासोबत जोडल्या जाणा-या "कॉम्प्युटर स्लीपमध्ये" न चुकता उल्लेख करण्याचे आदेश द्यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( आ.ज्ञा. होमकर )
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

<u>सोबत : तक्ता</u>

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर (५ प्रती)
महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (३ प्रती)
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (३ प्रती)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई-४०० ०३२
अधिदान व लेखा अधिकारी, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
वित्त विभाग (अर्थसंकल्प-६ आणि व्यय-९), मंत्रालय, मुंबई
अवर सचिव, पीएसी, पीएसी-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
कार्यासन अधिकारी, फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
लेखाधिकारी,फ-७ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
अवर सचिव, फ-१० कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
कार्यासन अधिकारी, फ-५ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
निवड नस्ती, ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक - पा ४४०६/२०११-२०१२/प्र.क्र. ६५ ब-२,

दिनांक १ एप्रिल, २०११ सोबतचा तक्ता

मुख्य लेखाशिर्ष- "४४०६ वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च" याखालील अनुदानाची नियंत्रणाधिकारी निहाय वाटणी (योजनेतर)(योजनांतर्गत) (दत्तमत)

(रुपये हजारात)

| लेख्याचे उपमुख्य/गौण/उपशिर्ष आणि संगणक संकेतांक | नियंत्रक अधिकारी व खर्चाची बाब | २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेली तरतूद (रकाना क्र.४ मधील तरतूदीसह) | १ एप्रिल, २०११ ते ३१ मे, २०११ या कालावधीतील खर्च भागविण्यासाठी सुपूर्द केलेली तरतूद |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| योजनांतर्गत (दत्तमत) | | | |
| ०१- वनीकरण | | | |
| ०७०- दळणवळण व इमारती | | | |
| पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना | प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर | | |
| (००)(०२) वनातील इमारती (४४०६ ००२६) | ०२- मजूरी | ० | ० |
| | २१- पुरवठा व सामुग्री | ० | ० |
| | ५३-मोठी बांधकामे | २७०३३ | ४५०६ |
| | एकूण | २७०३३ | ४५०६ |
| | ०१- वनीकरण एकूण | २७०३३ | ४५०६ |
| ७०-दळणवळण व इमारती | | | |
| (००)(०३) वनतळ्याचे बांधकाम (४४०६ ०७९७) | ०२- मजूरी | ० | ० |
| | २१- पुरवठा व सामुग्री | ० | ० |
| | एकूण | ० | ० |
| | एकूण-७०-दळणवळण व इमारती | ० | ० |
| | | | ० |
| १०१- वन संधारण व विकास | | | |
| (००)(०२) मृद संधारणासाठी वनरोपण (४४०६ ००४४) | ०२- मजूरी | २४००० | ४००० |
| | २१- पुरवठा व सामुग्री | ६००० | १००० |
| | ५०- इतर खर्च | ० | ० |
| | एकूण | ३०००० | ५००० |
| (००)(०३) वनाचे सर्वेक्षण जमाबंदी व सीमांकन (४४०६ ००५३) | | | |
| | ०२- मजूरी | २०० | ३३ |
| | २७-लहान बांधकामे | ३०० | ५० |
| | एकुण | ५०० | ८३ |
| (००)(०५)संपादित खाजगी वनांचे सवेक्षण व सीमाकन (४४०६ ००७१) | ०२- मजूरी | २०० | ३३ |
| | २७-लहान बांधकामे | ३०० | ५० |
| | एकुण | ५०० | ८३ |

पृ ३४ (२)

| | | | |
|---|---|---|---|
| (००)(०६) वनरोपणाचे भरभक्कम कायक्रम (४४०६ ०४९२) | ०२- मजूरी | ७६४०० | १२७३३ |
| | २१- पुरवठा व सामुग्री | १९१०० | ३१८३ |
| | **एकूण** | **९५५००** | **१५९१७** |
| (००)(०१)महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादिताचे भाग भंडवल (४४०६०१९८) | ५४-गुंतवणुक | ५०० | ८३ |
| | **एकुण** | **५००** | **८३** |
| | **एकूण-१०१** | **१२६५००** | **२१०८३** |
| | **एकूण-४४०६ - योजनांतर्गत (दत्तमत)** | **१५४०३३** | **२५६७२** |
| **योजनेतर (दत्तमत)** | | | ० |
| (०८)(०१) वन विकास करापासून मिळणा-या जमा रकमा मधून वित्त व्यवस्था करण्यात आलेल्या योजना (४४०६ ०१७१) | ०२- मजूरी | ७४४७ | १२४१ |
| | १३- कार्यालयीन खर्च | ५३६१ | ८९४ |
| | २१- पुरवठा व सामुग्री | ० | ० |
| | २२- शस्त्र व दारुगोळा | ० | ० |
| | २७- लहान बांधकामे | ७९४ | १३२ |
| | ५०- इतर खर्च | ३ | १ |
| | **एकूण-४४०६- योजनेतर (दत्तमत)** | **१३६०५** | **२२६८** |
| **एकूण -४४०६वनीकरण व वन्यजीवन (योजनांतर्गत + योजनेतर) (दत्तमत)** | | **१६७६३८** | **२७९४०** |